नागपुर-पुणे वंदे भारत रेल्वेचा 10 ऑगस्ट ला होणार शुभारंभ.. शेगावलाही मिळाला थांबा! >>पान 2

इतिहासाचे विकृतीकरण खपवून घेतले जाणार नाही >>पान 3

मेहकर तालुक्यातील अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांना ६६ कोटींची नुकसानभरपाई जाहीर >>पान 4

दैनिक

# आपला विदर्भ



वाणी कपूरनं दिलजीत दोसांझ स्टारर सरदार जी ३ चित्रपटाचा केला बचाव
आतील पान

**सुविचार**
जीवनातील प्रत्येक अनुभव एक शिकवण आहे.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 20 ■ शुक्रवार, दि. 08 ऑगस्ट 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# शेतकऱ्यांच्या हितासाठी भारत मोठी किंमत मोजण्यास तयार

## ट्रम्प यांच्या टॅरिफ वॉर दरम्यान पंतप्रधान मोदींचे वक्तव्य



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर अतिरिक्त २५ टॅरिफ लागू केल्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मोठे वक्तव्य केले आहे. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी भारत मोठी किंमत मोजण्यास तयार असल्याचे पीएम मोदी यांनी गुरुवारी म्हटले. त्यांनी आज दिल्लीतील एमएस स्वामीनाथन शताब्दी आंतरराष्ट्रीय परिषदेत संबोधित केले.

आमच्यासाठी, आमच्या शेतकऱ्यांचे हित हेच आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. भारत आपले शेतकरी, पशुपालक आणि मच्छीमार बंधू-भगिनींच्या हिताशी कधीही तडजोड करणार नाही. मला माहित आहे की याची आम्हाला त्याची मोठी किंमत मोजावी लागेल आणि आम्ही त्यासाठी तयार आहोत. आज, भारत माझ्या देशातील मच्छिमारांसाठी, माझ्या देशातील पशुपालकांच्या कल्याणासाठी आम्ही तयार आहोत, असे पीएम मोदी म्हणाले.

ट्रम्प यांनी भारतीय वस्तूंवर अतिरिक्त २५ टक्के टॅरिफ लागू केल्याच्या पार्श्वभूमीवर पीएम मोदी यांनी हे वक्तव्य केले आहे. अमेरिकेच्या टॅरिफमुळे व्यापारात घट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ज्याचा परिणाम अनेक क्षेत्रांवर होऊ शकतो.

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, शेतीवरील खर्च कमी करणे आणि उत्पन्नाचे नवीन स्त्रोत निर्माण करण्याच्या उद्दिष्टांवर आम्ही सतत काम करत आहोत. सरकारने शेतकरी ताकदीला देशाच्या प्रगतीचा एक आधार मानले आहे. यामुळेच गेल्या काही वर्षांत जी धोरणे तयार करण्यात आली ती केवळ मदत नव्हती, तर शेतकऱ्यांचा विश्वास वाढवण्याचा आमचा प्रयत्न होता. पीएम किसान सन्मान निधीद्वारे मिळत असलेल्या थेट मदतीमुळे छोट्या शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. पीएम पीक विमा योजनेने शेतकऱ्यांना जोखमींपासून सुरक्षा प्रदान केली आहे. पीएम कृषी सिंचन योजनेच्या माध्यमातून सिंचनाशी संबंधित समस्या सोडवल्या आहेत. १० हजार एफपीओच्या निर्मितीमुळे छोट्या शेतकऱ्यांची संघटित शक्ती वाढली आहे. सहकारी आणि बचत गटांना आर्थिक मदत मिळाल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवीन गती मिळाली आहे. ई-नाममुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेत उत्पादनाची विक्री करणे सोपे झाले आहे, असेही मोदी यांनी नमूद केले.

### 'स्वामीनाथन यांनी शेतकऱ्यांना शेतीच्या पद्धतीत बदल करण्यासाठी प्रेरित केले'

डॉ. स्वामीनाथन यांनी भारताला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनवण्यासाठी अभियन राबवले. शेतीमध्ये केमिकला वाढता वापर आणि मोनो-कल्चर फार्मिंगच्या धोक्यांबद्दल ते शेतकऱ्यांना सतत जागरूक करत राहिले. ते केवळ संशोधन करत नव्हते तर त्यांनी शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीच्या पद्धतीत बदल करण्यासाठी प्रेरित केले. आजही त्यांचा दृष्टिकोन आणि विचार भारताच्या कृषी क्षेत्रात सगळीकडे दिसून येतो. ते खरोखरच भारतमातेचे रत्न होते, असे ते म्हणाले.

## उद्धव ठाकरे यांना धनुष्यबाण मिळण्याची शक्यता ; आमदार रोहित पवार यांची पत्रकार परिषद

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** उद्धव ठाकरे यांना धनुष्यबाण मिळणार अशी शक्यता वाटत आहे, यामुळे एकनाथ शिंदे चिंतेत असतील. आम्ही फक्त शक्यता बोलवून दाखवले. आता एकनाथ शिंदे आणि अजित पवार मिडिया समोर येत नाही.अशी टिका आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत केली.

यावेळी ते खालिद का शिवाजी चित्रपटांवर प्रतिक्रिया देताना म्हणाले की, हा चित्रपट भारताच्या बाहेर दाखवला गेला. आजची सामाजिक परिस्थिती दाखवण्याचा प्रयत्न केला गेला आहे. हा चित्रपट इतिहासावर आहे की, परिस्थितीवर आहे ? हे पाहावे लागेल. सांस्कृतिक कार्यक्रम सुरू होता, तेव्हा भाजपच्या लोकांनी उठून विरोध केला.आरएसएस विरोध करत असतील, तर हा चित्रपट बघण्यासारखा आहे असे वाटते. प्रकाश आंबेडकर ज्या परिवारातून ते येतात त्यांचा आदर करतो. त्यांनी त्यांचे जे जे उमेदवार उभे केले तिथे तिथे भाजपला फायदा होतो. तिथे भाजपचा आमदार निवडून येतो. आम्ही आकडे दाखवू. वंचित बहुजन आघाडीचा फायदा झाला आहे. त्यांनी स्वतःचे सोडून दुसऱ्यांचे बोलले तर आम्ही काय करू ? सर्व काही चांगले सुरू नाही. त्यांना निधी मिळत नाही. त्यांना आयकर विभागाच्या नोटीस गेल्या आहेत. एकनाथ शिंदे यांच्या जवळच्या व्यक्ती विरोधात एक माणूस उपोषणाला बसले.भाजप चून चून के शिंदे यांच्या नेत्यांना संपवत आहे. संजय शिरसाट यांच्याकडे असलेल्या बॅग पाहिल्यावर आयकर विभागास वाटले की, इतरांना नोटीस पाठवावी.आम्ही जे जे बोलतो ते ते होत. अजित पवार आणि एकनाथ यांचे चेहरे बदलले आहेत.असे मत आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

## केडीएमसी अभ्यासिकेच्या मुद्यावर उद्धव सेनेसह विद्यार्थी आक्रमक

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याण डोंबिवली महापालिकेकडून सहजानंद चौकात स्वर्गीक खासदार प्रकाश परांजपे यांच्या नावाने स्पर्धा परिक्षा केंद्र चालविले जाते. त्याठिकाणी एक अभ्यासिका आहे. ही अभ्यासिका खाजगी कंत्राटदाराला दिल्याने त्यांच्याकडून जास्तीच्या पैसाची मागणी केली जात आहे. ही अभ्यासिका विद्यार्थ्यांना मोफत देण्यासाठी उद्धव सेनेसह विद्यार्थी आक्रमक झाले. त्यांनी गुरुवारी महापालिका मुख्यालयात धाव घेतली.

उद्धव सेनेचे पदाधिकारी रुपेश भोईर यांच्याकडे विद्यार्थ्यांनी त्यांची तक्रार मांडली होती. भोईर यांनी हा प्रकार उद्धव सेनेचे कल्याण शहर प्रमुख बाळा परब यांच्याकडे हा प्रश्न मांडला. परब यांच्यासह पदाधिकारी भोईर आणि दत्ता खंडागळे यांनी विद्यार्थ्यांसह महापालिका मुख्यालयात धाव घेतली. शहर प्रमुख परब यांनी सांगितले की, हे स्पर्धा परिक्षा केंद्र हे सामान्य विद्यार्थ्यांकरीता तयार केले. त्याठिकाणी विद्यार्थयांना केवळ नाममात्र २०० रुपये शुल्क आकारुन विद्यार्थ्यांना अभ्यासिकेचा लाभ घेता येत होता. आत्ता महापालिकेने खाजगी कंत्राटदार नेमल्याने त्यांच्याकडून जास्तीचे शुल्क विद्यार्थ्यांकडून मागितले जात आहे. त्याला विद्यार्थ्यांचा विरोध आहे. अन्य महापालिकांच्या हद्दीतील अभ्यासिका विद्यार्थ्यांना मोफत आहे. कल्याण डोंबिवली महापालिकेत विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारले जाऊ नये. अभ्यासिका विद्यार्थ्यांना मोफत दिली जावी. या मागणीसाठी उद्धव सेनेने विद्यार्थ्यांसह महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांची भेट घेतली. अतिरिक्त आयुक्त गोडसे यांनी सांगितले की, अभ्यासिकेचे दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले. त्यामुळे त्याठिकाणी विद्यार्थ्यांना असुविधा झाली. ही अभ्यासिका खाजगी कंत्राटदारामार्फत चालविण्याचे महापालिकेचे प्रयोजन आहे. मात्र अभ्यासिका विद्यार्थ्यांसाठी बंद ठेवू नका. उद्धव सेना आणि विद्यार्थ्यांच्या आवश्यक त्या मागणीचा विचार करुन निर्णय घेतला जाईल.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली अमेरिकेच्या वाढीव टॅरिफबाबत उच्चस्तरीय बैठक



**मुंबई/प्रतिनिधी :** अमेरिकेने वाढवलेल्या टॅरिफचा महाराष्ट्रावर काय परिणाम होऊ शकतो, याचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक झाली.

या बैठकीस मुख्यमंत्री यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीणसिंह परदेशी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी.गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, राज्यकर, वस्तू व सेवा कर आयुक्त आशिष शर्मा, उद्योग सचिव डॉ.पी. अन्बळगन, 'मित्रा'चे सहमुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल तसेच, 'मित्रा'चे अर्थ तज्ज्ञ संजीव सक्सेना, मुंबई स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे प्राध्यापक सत्यनारायण कोठे आणि अर्थतज्ज्ञ ऋषी शाह यांनाही निमंत्रित करण्यात आले होते.या बैठकीत जीडीपी, रोजगार, वाणिज्य आदी महत्वाच्या मुद्द्यांवर प्राथमिक चर्चा करण्यात आली. अमेरिकेच्या टॅरिफ धोरणामुळे राज्यातील निर्यातप्रधान उद्योगांवर संभाव्य परिणाम, तसेच जागतिक बाजारातील स्पर्धात्मकतेवर होणारे परिणाम याचा अभ्यास करण्याची गरज असल्याचे मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी सांगितले.राज्यातील उद्योगांचे हित आणि अर्थव्यवस्था बळकट ठेवण्यासाठी केंद्र सरकारशी तातडीने समन्वय साधून आवश्यक उपाययोजना आखण्यात येतील. या अनुषंगाने केंद्र सरकारकडून मार्गदर्शन घेण्यात येईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.राज्यातील उद्योगांचे हित जोपासण्यासाठी आणि अर्थव्यवस्था बळकट ठेवण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

## ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची मंत्रालयातील 'उमेद' विशेष विक्री प्रदर्शनाला भेट

### 'लाडक्या बहिणीं'नी मंत्री श्री.गोरे यांना बांधली राखी



**मुंबई/प्रतिनिधी :** ग्रामीण भागातील महिलांना स्वयंपूर्ण आणि उद्योजक बनविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या विशेष विक्री प्रदर्शनास ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी भेट दिली.

या प्रदर्शनात महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंचे निरीक्षण करत, मंत्री श्री. गोरे यांनी महिलांशी संवाद साधून त्यांना प्रेरणा दिली.ग्रामीण महिलांना मुंबईत व्यासपीठ राष्ट्रीय हातमाग दिन आणि रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या प्रदर्शनात पालघर, पनवेल, कर्जत, पेण आणि जळगाव जिल्ह्यांतील एकूण १० महिला बचत गटांनी सहभाग घेतला. या गटांनी तयार केलेल्या वस्तूंमध्ये आकर्षक राख्या, पौष्टिक लाडू, पारंपरिक तोरण, हस्तनिर्मित दागिने, जाम, जेली आणि ज्यूस यांचा समावेश आहे. तसेच, 'हर घर तिरंगा' उपक्रमाअंतर्गत भारतीय राष्ट्रध्वज ''तिरंगा'' देखील विक्रीसाठी ठेवण्यात आला आहे. मंत्र्यांकडून महिलांना मार्गदर्शन आणि आश्वासन प्रत्येक स्टॉलला भेट देत मंत्री श्री. गोरे यांनी उत्पादनांची माहिती घेतली आणि महिलांना विक्री व ब्रँडिंगसंबंधी मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, ''या उपक्रमांद्वारे ग्रामीण महिलांना आर्थिक संधी उपलब्ध होत असून, शासनाची भविष्यातही अशीच साथ राहणार आहे.''या भेटीदरम्यान 'उमेद'च्या लाडक्या बहिणींनी मंत्री श्री.गोरे यांना राखी बांधली. या वेळी उमेद अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर, अवर सचिव धनवंत माळी, तसेच इतर मान्यवर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## गडचिरोलीत भीषण अपघात, मॉर्निंग वॉक करणाऱ्या सहा विद्यार्थ्यांवर ट्रक चढला; चौघांचा मृत्यू, दोघांची प्रकृती चिंताजनक

दैनिक आपला विदर्भ





**गडचिरोली /प्रतिनिधी :** गडचिरोली जिल्ह्यातील काटली गावाजवळ आज पहाटेच्या सुमारास घडलेल्या भीषण अपघातात मॉर्निंग वॉकसाठी गेलेल्या सहा विद्यार्थ्यांना ट्रकने जोरदार धडक दिली. या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला असून, दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. उर्वरित दोघांची प्रकृती अत्यवस्थ असून, त्यांच्यावर गडचिरोली जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

ही घटना सकाळी सुमारे ५ ते ६ वाजण्याच्या सुमारास घडली. काटली येथील सहा विद्यार्थी नियमित व्यायामासाठी रस्त्यावर चालत असताना भरधाव ट्रक त्यांच्या अंगावर चढला. अपघातानंतर ट्रक चालक ट्रकसह पळून गेला. या घटनेमुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.

अपघातानंतर संतप्त गावकऱ्यांनी रस्त्यावर उतरून तीव्र चक्काजाम आंदोलन केले. घटनास्थळी पोलीस दाखल झाले असून, त्यांनी गर्दी नियंत्रणात घेत तपास सुरु केला आहे. ट्रकचा व चालकाचा शोध घेण्याचे काम सुरू असून, परिसरातील येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांची कसून तपासणी केली जात आहे.

गंभीर जखमी विद्यार्थ्यांवर तातडीने उपचार सुरू करण्यात आले असून, आवश्यक असल्यास पुढील उपचारासाठी त्यांना नागपूर हलविण्याची तयारी आरोग्य यंत्रणेकडून केली जात आहे.

दरम्यान, नागरिकांनी सुसाट वेगाने वाहने चालवणारे चालक व मद्यप्राशन करून वाहन चालवणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या अपघाताने जिल्ह्यात शोककळा पसरली असून, विद्यार्थी व त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके

आज ८ ऑगस्ट, आपल्या इरसाल आणि गावरान भाषेतील विनोदाने महाराष्ट्राला खळखळून हसवणारे विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके यांची जयंती. जवळपास तीन दशकांहून अधिक काळ मराठी चित्रपट सृष्टीवर एकहाती अधिराज्य गाजवून मराठी सिनेमाला सुवर्णकाळ दाखवणाऱ्या विनोद सम्राट दादा कोंडके यांचा जन्म ८ ऑगस्ट १९३२ रोजी मुंबईतील नायगाव येथे झाला. त्यांचा जन्म झाला तो दिवस गोकुळ अष्टमीच्या होता, आपल्या पोटी बाळकृष्ण जन्माला आला म्हणून आई वडिलांनी त्यांचे नाव कृष्णा ठेवले. पण लहानपणापासूनच सर्व जन त्यांना दादा म्हणत पुढे त्यांचे नाव रूढ झाले. त्यांच्या मोठ्या बंधूचे निधन झाल्याने त्यांच्यावर घराची जबाबदारी पडली त्यामुळे दादा दरमहा साठ रुपये पगारावर सेवादलाच्या बँड पथकात काम करू लागले. लहानपणापासून दादांना कलेची आवड होती. सेवादलाच्या बँड पथकात त्यांच्या कला आणखी बहरून आल्या. फावल्या वेळात प्रसिद्ध गाण्यांचे विडंबन करणे, गाण्यांना चाली लावणे, विचित्र गाणी रचणे असे उद्योग दादा करू लागले. निळू फुले, राम नगरकर यासारखे जेष्ठ कलाकारही त्या काळात सेवादलात होते. तिथेच दादांची या महान कलाकारांशी मैत्री झाली आणि ही मैत्री पुढे आयुष्यभर टिकून राहिली. दादा सेवादलाच्या बँड पथकात काम करत असल्याने त्या काळात त्यांना बँड वाले दादा म्हणूनच लोक ओळखत असे. पुढे दादांनी स्वतःचा फड काढला. गावोगावी जाऊन दादा स्वतःची कला सादर करू लागले. वसंत सबनिसांच्या विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने दीडशे प्रयोग पूर्ण केले. त्या काळी हा विक्रम होता. या वगनाट्यामुळे दादा भलतेच लोकप्रिय झाले. गावागावांतील रसिक प्रेक्षक दादांना ओळखू लागले. याच वगनाट्यातील त्यांचे काम पाहून महान दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांनी त्यांना थेट चित्रपटात काम करण्याची संधी दिली. भालजी पेंढारकर यांनी त्यांना त्यांच्या तांबडी माती या चित्रपटात मुख्य भूमिका दिली. दादांनी या भूमिकेचे सोने केले. हा चित्रपट तिकीटबारीवर हिट झाला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. या चित्रपटानंतर दादांनी मागे वळून पाहिले नाही. मराठी चित्रपट सृष्टीत दादा कोंडके हे सर्वत्र नाव घुमू लागले. १९७१ साली दादा कोंडके यांनी दिग्दर्शित केलेला सोंगाड्या हा चित्रपट प्रदर्शित झाला मात्र मुंबईतील चित्रपटगृह चालकांनी आपल्या चित्रपटगृहात सोंगाड्या न लावता तीन देविया हा हिंदी चित्रपट लावला. आपल्या पहिल्याच चित्रपटाला चित्रपटगृह मिळत नसल्याचे पाहून दादा उद्विग्न झाले आणि त्यांनी थेट बाळासाहेब ठाकरेंची भेट घेतली मग काय बाळासाहेबांचा आदेश आणि शिवसैनिकांचा चित्रपटगृहात राडा. शिवसैनिकांनी चित्रपटगृहात घातलेल्या राड्याने आणि बाळासाहेबांच्या आदेशाने सोंगाड्या चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. नुसताच प्रदर्शित झाला नाही तर सुपर डूपर हिट झाला. सोंगाड्या पाहायला प्रेक्षकांच्या रांगा लागल्या. सोंगाड्या हा त्या काळातील सर्वाधिक हिट मराठी चित्रपट ठरला. सोंगाड्यामुळे मरगळलेल्या मराठी चित्रपट सृष्टीला ऊर्जितावस्था मिळाली. तमाशापटाला कंटाळलेल्या मराठी चित्रपट रसिकांना सोंगाड्यात दादांनी आपल्या विनोदाने मनमुराद हसवले. दादांच्या विनोदाला मराठी रसिकांनी मनमुराद दाद दिली. सोंगाड्याच्या अभूतपूर्व यशानंतर दादा कोंडके यांनी आणखी एका नव्या चित्रपटाची घोषणा केली या चित्रपटाचे नाव होते एकटा जीव सदाशिव. सोंगाड्यामुळे दादांची लोकप्रियता तुफान वाढली होती. या लोकप्रियतेचा धसका हिंदी चित्रपट सृष्टीनेही घेतला होता. दादांनी एकटा जीव सदाशिव या चित्रपटाची घोषणा केल्यावर राज कपूर यांनी त्यांच्या मुलासाठी म्हणजे ऋषी कपूर साठी काढलेला बॉबी या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली. सोंगाड्या पाठोपाठ एकटा जीव सदाशिव हा चित्रपटही सुपर हिट झाला. त्यानंतर दादांनी पांडू हवालदार या चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटात दादांनी अशोक सराफ यांना संधी दिली. हा चित्रपटही यशस्वी ठरला मग काय त्यानंतर दादांच्या यशस्वी चित्रपटांची मालिकाच सुरू झाली. तुमचं आमचं जमल, राम राम गंगाराम, बोट लावील तिथं गुदगुल्या, ह्योच नवरा पाहिजे, आली अंगावर, मुका घ्या मुका, पळवा पळवी, येऊ का घरात, सासरचे धोतर असे दादांचे सलग चित्रपट यशस्वी झाले. सलग नऊ रौप्य महोत्सवी चित्रपट देण्याचा विक्रम दादांनी केला. त्यांच्या या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली. त्यांच्या यशस्वी चित्रपटात त्यांच्या इरसाल विनोदाचा जितका वाटा होता तितकाच त्या चित्रपटातील श्रवणीय गाण्यांचा देखील होता. दादा कोंडके यांच्या चित्रपटातील सर्व गाणी गाजली. आजही दादांच्या चित्रपटातील गाणी तितकीच लोकप्रिय आहेत. दादांचे चित्रपट जितके लोकप्रिय झाले तितकेच ते वादग्रस्तही ठरले. त्यांच्या सर्वच चित्रपटांना सेन्सॉर बोर्डने आडकाठी आणली मात्र दादांनी सेन्सॉर बोर्डाच्या या दंडेली पुढे कधीही नमते घेतले नाही उलट सेन्सॉर बोर्डशी त्यांनी कायम दोन हात केले. ज्या शिवसेनेमुळे त्यांचे चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होऊ शकले त्या शिवसेनेशी त्यांनी कधीही प्रतारणा केली नाही. आयुष्यभर त्यांनी शिवसेनेशी बांधिलकी राखली. १४ मार्च १९९८ रोजी हृदय विकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. दादांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वावर दुःखाचा डोंगर कोसळला. प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या विनोदाच्या या सम्राटाने अशी अकाली एक्झीट घेतल्याने प्रेक्षकांना मोठा धक्का बसला. त्यांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वाला सुवर्णकाळ दाखवणारा विनोदाचा सम्राट काळाच्या पडद्याआड गेला. मराठी चित्रपट सृष्टीत त्यांच्यासारखा विनोद सम्राट पूर्वी झाला नाही आणि पुढेही होणार नाही. विनोद सम्राट दादा कोंडके यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# नागपुर-पुणे वंदे भारत रेल्वेचा १० ऑगस्ट ला होणार शुभारंभ.. शेगांवलाही मिळाला थांबा!

## केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी मानले केंद्रिय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांचे आभार!

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** नागपुर-पुणे वंदे भारत एक्स्प्रेसला संत नगरी शेगांव मध्ये थांबा मिळवुन देण्याचे काम केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केले आहे. यासंदर्भातील परिपत्रक रेल्वे विभागाच्या वतीने आज ७ ऑगस्ट रोजी काढण्यात आले आहे. १० ऑगस्ट ला वंदे भारत ट्रेन चे उदघाटन होणार असुन या वंदे भारत ट्रेनमुळे नागपुर आणि पुणे येथुन येणाऱ्या संत गजानन महाराजांच्या भक्तांना विशेष प्रवास सुविधा मिळणार आहे. वंदे भारत रेल्वे सुरु करण्यासंदर्भात व शेगांव ला थांबा मिळण्यासाठी नुकतीच केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांची भेट घेतली होती त्यानंतर हे परिपत्रक निर्गमित झाले आहे.

देशांतर्गत रेल सेवेला गतीमान करण्याच्या दृष्टीकोनातुन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वंदे भारत रेल सेवा सुरु केली आहे. अत्यंत जलद आणि लोकांना आधुनिक सुख सुविधा देणारी भारतीय बनावटीची वंदे भारत रेल्वे भारतीयांच आकर्षण ठरली आहे. नागपुर ते पुणे हे दोन महानगर वंदे भारत रेल्वे मार्गाने जोडण्याचे काम केंद्र सरकारच्या रेल्वे विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. ही गाडी सुरु होत असतांना पहिल्या परिपत्रकामध्ये अजनी, नागपुर, वर्धा, बडनेरा, अकोला, भुसावळ, जळगांव, मनमाड, कोपरगांव, अहिल्यानगर, दौंड मार्गे पुणे असा वंदे भारत रेल्वे चा प्रवास थांबा मंजुर करण्यात आले होते. विदर्भाची पंढरी म्हणुन ओळख असलेल्या बुलढाणा जिल्हयातील संतनगरी शेगांव येथील दररोज देशभरातुन भाविक येत असतात. नव्याने सुरु होत असलेल्या वंदे भारत या रेल्वेला शेगांव येथे थांबा मिळावा यासाठी केंद्रिय आयुष आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री तथा बुलढाणा जिल्हयाचे खासदार प्रतापराव जाधव यांनी केंद्रिय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांची भेट घेवुन मागणी केली होती. शेगांव संस्थान विषयी रेल्वे मंत्र्यांना माहिती देऊन हा थांबा भाविकांसाठी महत्वाचे असल्याचे त्यांना पटविन दिले होते. त्या नंतर रेल्वे विभागाच्या वतीने शेगांव रेल्वे स्थानकाला थांबा देण्यासंदर्भातील परिपत्रक ७ ऑगस्ट ला रेल्वे बोर्डाचे निदेशक संजय निलम यांच्या स्वाक्षरीने निर्गमीत झाला आहे. नागपुर-पुणे वंदे भारत एक्सप्रेसचा शुभारंभ १० ऑगस्ट ला होणार आहे. हि गाडी आठवडयातुन ६ दिवस चालणार असुन नागपुर येथुन सकाळी ०९.५० ला सुटनार असुन वर्धा, बडनेरा, अकोला, मार्गे दुपारी ०१.२० च्या दरम्यान शेगांव येथे ही वंदे भारत रेल्वे थांबणार आहे. तर परतीच्या प्रवासात पुण्यावरुन येतांना दुपारी ०२.४५ वा. शेगांव येथे ही रेल्वे थांबणार आहे. नागपुर-पुणे हे ८८४ कि.मी. चे अंतर ही वंदे भारत रेल्वे अवघ्या १० तासात पुर्ण करणार आहे. सकाळी ०९.५० ला नागपुर येथुन सुटणारी ही वंदे भारत ट्रेन प्रवाशांना त्याच दिवशी रात्री ०९.५० ला पुणे येथे सोडणार आहे.





बुलढाणा लोकसभा मतदार संघातील शेगांवचे संत गजानन महाराज संस्थान संपुर्ण देशामध्ये प्रसिध्द आहे. देशभरातुन लाखो भाविक संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठी शेगांव नगरीमध्ये येत असतात. पुणे आणि नागपुर हे दोन्ही महानगर हवाई सेवेशी जोडलेले आहे. या महानगरातुन देश-विदेशातुन येणाऱ्या संत गजानन महाराजांच्या भक्तांना प्रवासाची सुविधा उपलब्ध करुन देणारी हि वंदे भारत रेल्वे ठरणार आहे. भाविकांच्या आणि मतदार संघातील नागरीकांच्या सुविधेसाठी केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी वंदे भारत ट्रेनला शेगांव येथे थांबा मिळवुन दिल्याने तिचा लाभ भक्तांसोबत जिल्हयातील नागरीकांनाही होणार आहे. केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केलेली मागणी केंद्रिय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांनी मान्य करुन या संदर्भातील परिपत्रक निर्गमित केल्याने केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी जिल्हावासीयांच्या वतीने केंद्रिय रेल्वे मंत्र्यांचे आभार मानले आहेत.

# मौजवाडी ग्रामस्थांनी लावले अजित पवारांचा ताफा जाणाऱ्या रस्त्यावर अनोखे बॅनर




**बीड/प्रतिनिधी :** गेल्या २० वर्षांपासून गावाला रस्ता नसल्याने आता ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. बीडच्या मौजवाडी ग्रामस्थांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार ज्या महामार्गावरून जाणार आहेत. त्या महामार्गाच्या रस्त्याच्या कडेलाच बॅनर लावला आहे. या बॅनर वर रस्ता द्या.. रस्ता द्या.. अजितदादा आमच्या गावाला रस्ता द्या.. काटेवाडी प्रमाणे आमच्या गावाला रस्ता द्या आमची तुमच्याकडून हीच अपेक्षा आहे असा मजकूर लिहिलेला आहे. तर याच बॅनरच्या लगत गावातील शेकडो तरुण हे अजित पवारांच्या भेटीसाठी जमलेले आहेत.

# राज्यात १२०० कोटीपेक्षा जास्त कर्ज वाटप

## आण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळ अध्यक्ष नरेंद्र पाटील यांची पत्रकार परिषद

दैनिक आपला विदर्भ



**नाशिक/प्रतिनिधी :** राज्यात मराठा उद्योजकांसाठी महामंडळाची पुर्नबांधणी केली आहे. महामंडळाची कामे राज्यभर सुरू आहेत.महामंडळ म्हणजे भ्रष्टाचार असे बोलले जायचे.१.५० लाख लाभार्थ्यांपर्यंत पोहचलो, १२०० कोटीपेक्षा जास्त कर्ज वाटप केले आहे.अशी माहिती आण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळ अध्यक्ष नरेंद्र पाटील यांची पत्रकार परिषदेत दिली यावेळी ते म्हणाले की, कर्ज वाटपात राष्ट्रीयकृत आणि इतर बँकांचा समावेश आहे.धुळ्यात लवकरात लवकर काम करून देतो म्हणून काही मागणी केल्याची तक्रार आली होती. महामंडळाचा कर्मचारी त्यावर कारवाई झाली अटक झाली आहे. काही ऑनलाइन एजंट यांच्याकडून फसवणूक झाल्याचे उत्तर महाराष्ट्रात काही त्रुटी आढळून आल्या आहेत.कागदपत्रात मराठा शब्द घालून लाभ दिला. कर्ज दिले नसताना काही बँकेत घोटाळे झाल्याचे निदर्शनास आले. हा संघटित क्राईम असल्याचे दिसून आले. आज नाशिक पोलिसांना यात लेखी दिले, त्यावर पोलिस कारवाई करणार आहे. ऑनलाइन असल्यामुळे यात काही गैरप्रकार होईल पण त्यात इतर खोटे प्रकरण समोर येईल. नाशिकमध्ये माँ साहेब स्मारक पाहिले.३१ डिसेंबर च्या आत आमच्या ताब्यात मनपाने द्यावे, अशी विनंती केली. बोगस लाभार्थी आणि इतर प्रकरण होत आहे. कोणत्या तालुक्यात लाभार्थी असणार याचे बॅनर पुढील काळात लावले जातील. बोगस लाभार्थी प्रकरणात आठ ते दहा केस शोधल्या आहे ( नाशिक आणि अहिल्यानगर) आर्थिक फसवणूक झाल्याचे निदर्शनास येईल यावर कारवाई होईल. इतर नॉन मराठा असून कागदपत्र फेरफार करून लाभ घेतला आहे. राज्यात त्याबद्दलची माहिती घेत आहोत, हे पुढे वाढू नये यासाठी काम करतोय. शासनामध्ये डीबीटी पद्धत आहेत. त्या वापरण्याचा आमचा प्रयत्न महामंडळात आहे. चुकीच्या पद्धतीने काम करेल त्यावर कारवाई होईल. इ सेवा केंद्र किंवा इतर माध्यमांवर जिल्हा प्रशासन कठोर निर्णय घेतील. यात अधिकारी कर्मचारी असले तरी त्यांवर पोलिस चौकशी करतील. कारवाई होईल. मराठा समाज आहे हे शाळेच्या दाखल्यावर पुरावा घेऊन लाभ देत होती यावर इतर कार्यवाही सुरू आहे. मागील काळात भेटी दिलेल्या बँकांनी कमीत कमी व्याज लाभार्थांना दिला आहे. वादग्रस्त चित्रपटावर राज्य सरकारने पुढाकार घ्यावा या चित्रपटाला पूर्णपणे बंदी घालायला हवी आहे. मागील काळातही अशा घटना घडल्या होत्या, तेव्हा मराठा समाज एकवटला होता. चित्रपटाच्या माध्यमातून एक नवीन वाद निर्माण करून देण्याचा प्रयत्न करताय. छत्रपतींचे अंगरक्षक जे ११ आहे असे सांगितले जातात ते कुठेही नव्हते.सर्व विश्वासू हे हिंदुत्ववादी होते.विधानसभेत आणि विधान परिषदेत काही मुस्लिम आमदार होते ते म्हणायचे ५० टक्के मुस्लिम शिवाजी महाराजांसोबत होते. हे सगळ लबाड आहे. इतिहासकारांनी त्या आमदारांबद्दल चे वक्तव्य खोडून काढले आहे. सर्व मराठा संघटना एकवटतील आणि चित्रपट काढणाऱ्यांना महागात पडेल. राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी चुकीचा चित्रपट ताबडतोब रोखला पाहिजे, आम्ही काही ऐकणार नाही. असा इशारा आण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळ अध्यक्ष नरेंद्र पाटील यांची पत्रकार परिषदेत दिला.

## पुण्यात साकारले जाणार ''ऑपरेशन सिंदूर'' चा देखावा





**पुणे/प्रतिनिधी :** काही दिवसातच गणपती बाप्पाचे आगमन होते. पुण्यातील गणेश उत्सवाचे महाराष्ट्रातच नाही, तर देशातील लोकांना वेगळा आकर्षण असते. पुण्यातील देखावे पाहण्यासाठी राज्यभरातून नागरिक पुण्यात येत असतात. यावर्षी पुण्यातील देखाव्यांमध्ये आकर्षण ठरणार आहे. तो म्हणजे ऑपरेशन सिंदूर चा देखावा. हा देखावा पुण्यातील बाणेर परिसरात तयार होतो आहे. मूर्तिकार सतीश तारू हे अनेक देखावे तयार करत असतात, मात्र त्यांनी ऑपरेशन सिंदूर हा देखावा तयार केला आहे. दरवर्षी पुण्यात सार्वजनिक गणेश मंडळ असो किंवा घरगुती गणेशोत्सव असो यामध्ये सामाजिक संदेश देणारे, पर्यावरण पूरक संदेश देणारे, तसेच ऐतिहासिक संदेश देणारे देखावे सादर केले जातात. मात्र पहलगम मध्ये झालेला भ्याड हल्ल्याच्या अनुषंगाने पुण्यामध्ये तयार केला जातो आहे. या देखाव्याला मोठ्या प्रमाणात मागणी असल्याचे प्रतिष्ठान सांगतात. या देखाव्यात आपण जर अतिशय हुबेहुब सर्व प्रतिकृती दाखवण्यात आल्या आहेत. या देखाव्या संदर्भात मूर्तिकार सतीश तारू यांनी असे सांगितले. भारत देश आता कमजोर राहिलेला नाही, हाच संदेश त्यांनी या देखव्यातून दिला आहे. प्रत्येक जण वेगवेगळ्या प्रकारे देशप्रेम दाखवत असतात, सतीश तारू हे मागील ५२ वर्षांपासून देखव्याच्या माध्यमातून वेगवेगळ्या देखव्यांच्या माध्यमातून देशाला संदेश देतात, त्यातूनच त्यांचे देशप्रेम दिसते.

## वाणी कपूरनं दिलजीत दोसांझ स्टारर सरदार जी ३ चित्रपटाचा केला बचाव

**मुंबई/प्रतिनिधी :** काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर बॉलिवूड अभिनेत्री वाणी कपूरची सोशल मीडियावर टीका करण्यात आली होती. या टीकेचं कारण म्हणजे अबीर गुलाल हा चित्रपटात होता. या चित्रपटात पाकिस्तानी अभिनेता फवाद खानबरोबर वाणीनं काम केलं. फवाद या चित्रपटाच्या माध्यामातून बॉलिवूडमध्ये पुनरागमन करणार होता. चित्रपटाच्या प्रदर्शनासाठी काही दिवसच शिल्लक होते, मात्र पहलगाममध्ये झालेल्या हल्यामुळं या चित्रपटाच्या रिलीजवर बंदी घालण्यात आली.

पहलगाममधील मोठ्या अपघातानं पुन्हा एकदा भारत आणि पाकिस्तानमध्ये वैर निर्माण झालं. यानंतर पाकिस्तानी कलाकारांसह त्यांच्या कंटेंटवरही भारतात बंदी घालण्यात आली.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# इतिहासाचे विकृतीकरण खपवून घेतले जाणार नाही

## सांस्कृतिक कार्यमंत्री मंत्री ॲड.आशिष शेलार : 'खालिद का शिवाजी' चित्रपटाचे पुनर्परीक्षण करावे; राज्य शासनाची केंद्र सरकारला विनंती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** ''इतिहासाचे विकृतीकरण कोणत्याही परिस्थितीत मान्य केले जाणार नाही,'' असे ठाम प्रतिपादन सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले. 'खालिद का शिवाजी' या चित्रपटाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींची गंभीर दखल घेत राज्य शासनाने या चित्रपटाचे तातडीने पुनर्परीक्षण करण्याची विनंती केंद्र सरकारकडे केली आहे.

काल शिवसमर्थ प्रतिष्ठानचे संघटक निलेश भिसे यांनी सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.शेलार यांची भेट घेऊन चित्रपटाविरोधातील तक्रार व निवेदन सादर केले. या चित्रपटात इतिहासाची मोडतोड करून जनभावना दुखावणारे दृश्य आणि संवाद असल्याचा आरोप करण्यात आला आहे.या पार्श्वभूमीवर बोलताना मंत्री ॲड.शेलार म्हणाले की, चित्रपट परिनिरीक्षण मंडळ हे केंद्र सरकारच्या अखत्यारित येते. या चित्रपटाच्या पुनर्परीक्षणाबाबत केंद्र सरकारशी तातडीने पत्रव्यवहार करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. गरज पडल्यास संबंधित केंद्रीय मंत्री व अधिकाऱ्यांशीही चर्चा करणार




असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. राज्य शासनाला या चित्रपटाविरोधात मोठ्या प्रमाणावर निवेदने व तक्रारी प्राप्त झाल्या असून, छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी चुकीची व विकृत माहिती देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. चित्रपटातील अनेक संवादांवर इतिहास अभ्यासक व शिवप्रेमींनी तीव्र आक्षेप नोंदवले आहेत, असेही मंत्री ॲड. शेलार यांनी स्पष्ट केले.या पार्श्वभूमीवर सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी केंद्रीय माहिती व प्रसारण विभागाचे सचिव यांना पत्र पाठवून त्यात चित्रपटाचे पुनर्परीक्षण, दिलेल्या प्रमाणपत्राचा पुनर्विचार आणि पुनर्परीक्षण होईपर्यंत चित्रपटाचे प्रदर्शन थांबवावे अशी विनंती केली आहे.मंत्री ॲड.शेलार पुढे म्हणाले की, या चित्रपटाला केंद्रीय सेन्सॉर बोर्डाचे प्रमाणपत्र कसे मिळाले? परीक्षण समितीने चित्रपटाचा योग्य अभ्यास केला होता का? यासंदर्भात चौकशी व्हावी. तसेच हा चित्रपट कान्स चित्रपट महोत्सवासाठी कसा निवडला गेला, यामध्ये कोणता खोडसाळपणा झाला आहे का, हे तपासले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.या चित्रपटावर बंदी घालण्याची मागणी करणारी निवेदने अनेक संस्था, संघटना व इतिहास अभ्यासकांकडून देण्यात आली असून, शासन या सर्व तक्रारींचे गांभीर्याने परीक्षण करत असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## संक्षिप्त...

### ड्रायव्हरच्या वैयक्तिक जीवनाशी आमचा काही संबंध नाही : आमदार विलास भुमरे



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** मला असे वाटते की, आम्ही कुणाला कामावर ठेवू नये, आमच्याकडे ड्रायव्हर असेल किंवा पीए असेल जे आमच्याकडे कामाला असतील, मी मागेच सांगितले ड्रायव्हर आमच्याकडे गाडी चालवायला आहे. वैयक्तिक त्याच्या जीवनाशी काही संबंध नाही. तो ड्रायव्हरचा प्रश्न असून आमचा आणि त्याचा तीळ मात्र संबंध येत नाही. वारंवार आमचे नाव घेण्यामागील हेतू काय आहे, ते समजत नाही. अशी प्रतिक्रिया आमदार विलास भुमरे यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की, भूमरे परिवार आज जिल्ह्याच्या राजकारणात सक्रिय आहे. आणि राजकीय दृष्ट्या कसे बदनाम करता येईल या दृष्टीने हा प्रकार सुरू आहे. चौकशी सुरू असून दूध का दूध पाणी का पाणी कोर्टात होईल. पदाचा गैरवापर करून आम्ही आमच्या घरच्यांच्या नावावर प्रॉपर्टी केली असती, कोणी मूर्ख आहे का बाहेरच्या लोकांच्या नावावर प्रॉपर्टी करायला ? या प्रकरणाविषयी मला काहीही माहिती नाही, त्या प्रकरणाशी आमचा काहीही संबंध नाही. त्यामुळे त्या प्रकरणाविषयी आम्हाला प्रश्न विचारू नका, अशी प्रतिक्रिया आमदार विलास भुमरे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

### सर्वेक्षणातून आलेली आकडेवारी लक्षात घेऊन कर्जमाफी; मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची पत्रकार परिषदेत माहिती

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करण्यासाठी समिती नेमली आहे. त्यातून येणारी आकडेवारी लक्षात घेऊन कर्जमाफी लवकरच होणार आहे.अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी ते म्हणाले की, महसूल विभाग लोकाभिमुख काम करणार. भ्रष्टाचारमुक्त गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख प्रशासन आम्ही करणार आहोत. जेव्हा जेव्हा निवडणूक येते, तेव्हा ईव्हीएम आठवते. आमच्याकडे रोज काँग्रेसचे लोक पार्टीत येत आहेत. मुंबई महानगरपालिका हातातून जात आहे, त्यामुळे ईव्हीएम रडगाणे सुरू झाले आहे.इतकी वाईट पद्धतीने विरोधी पक्ष पाहिला. सामना रोज वाईट लिहितो. त्यापेक्षा प्रश्न वेगळे आहेत. मीडियामध्ये छापण्यासाठी बातमी आहे. महायुतीमध्ये काम करतो आहे. काल दिल्लीला जाण्यापूर्वी एकनाथ शिंदे आम्ही एकत्र बसलो होतो. एनडीए म्हणून काम करताना संवाद झाला पाहिजे. शेतकऱ्यांची कर्जमाफी व्हावी. शेतकऱ्यांचे सर्वेक्षण झाले पाहिजे. त्यासाठी समिती नेमली आहे. त्यातून येणारी आकडेवारी लक्षात घेऊन कर्जमाफी लवकरच होणार आहे.अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

### मुंबई-गोवा नॅशनल हायवेचे चौपदरीकरण पुढील १ वर्षात १०० टक्के पूर्ण होणार- मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले





**रायगड/प्रतिनिधी :** मागील १७ वर्षांपासून मुंबई-गोवा नॅशनल हायवेचे काम धीम्यागतीने सुरू आहे. गणेशोत्सवापूर्वी या महामार्गाच्या कामाची पाहणी आज सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केली. मुंबई-गोवा नॅशनल हायवेचे चौपदरीकरणाचे काम पुढील १ वर्षात १०० टक्के पूर्ण होणार असल्याची ग्वाही मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिली.

गणेशोत्सवात कोकणवासीय व चाकरमानी यांचा प्रवास सुखकर होण्याच्या दृष्टिने महामार्ग खड्डेमुक्त करण्याच्या सूचना मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. महामार्गावर अनेक गावानजीकचे बायपास, सर्व्हिस रोड, अपघाती ठिकाणे, नवीन पूल यांची देखील पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. ठिकठिकाणी थांबून नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्या समस्या जलद सोडविण्याचे त्यांनी आश्वासन दिले. यावेळी वडखळ ग्रामस्थांनी मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना निवेदन देऊन आपल्या तक्रारी मांडल्या. पनवेल पळस्पे-कासु ते वडपाले महाड पर्यंत ते महामार्गाची पाहणी करणार आहेत. यावेळी आमदार रविशेठ पाटील, जिल्हाधिकारी किसन जावळे, पोलीस अधीक्षक आंचल दलाल, जिल्हा परिषद मुख्याधिकारी नेहा भोसले, वैंकुठशेठ पाटील, नॅशनल हायवेचे अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी,उपस्थित होते.

## महाराष्ट्र शासनाचे २० वर्षे मुदतीचे १,००० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या २० वर्षे मुदतीच्या १००० कोटींच्या '७.१४ टक्के महाराष्ट्र शासनाचे रोखे ,२०४५' च्या ( दि.९ जुलै २०२५ रोजी उभारलेल्या) रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकान्वये दिली आहे.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त १ टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल. १२ ऑगस्ट, २०२५ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् १२ ऑगस्ट, २०२५ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान १३ ऑगस्ट, २०२५ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील. कर्जरोख्याचा कालावधी २० वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी ९ जुलै, २०२५ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड दिनांक ९ जुलै, २०४५ रोजी पूर्ण किमतीने केली जाईल. व्याजाचा दर हा ७.१४ टक्के दरसाल दर शेकडा एवढा असेल. व्याजाचे प्रदान रोख्याच्या मूळ दिनांकापासून मूळ किमतीवर प्रतिवर्षी दिनांक ९ जानेवारी आणि ९ जुलै रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल शासकीय रोख्यांमधील बँकांची गुंतवणूक ही बँकिंग विनियम अधिनियम, १९४९ खालील कलम २४ अंतर्गत सांविधिक रोकड सुलभता गुणोत्तर () या प्रयोजनार्थ पात्र समजण्यात येईल. हे कर्जरोखे पुन: विक्री-खरेदीसाठी अनुज्ञेय असतील, अशी माहिती वित्त विभागाने दिली आहे.

## पोलीस ठाण्यांमधील कार्यरत रोजंदारी सफाई कामगारांसाठी किमान वेतनाबाबत कार्यवाही करावी : गृह राज्यमंत्री योगेश कदम

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील पोलिस ठाण्यांमधील आस्थापनेवर कार्यरत रोजंदारी सफाई कामगारांसंदर्भात २७ जानेवारी २०१७ च्या शासन अधिसूचनेप्रमाणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार किमान वेतनाबाबत कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले.

राज्यमंत्री योगगेश कदम म्हणाले, राज्यात विविध पोलिस ठाण्यात १८०० रोजंदारी कर्मचारी कार्यरत आहेत. या कामगारांना अन्य विभागामध्ये देण्यात येत असलेले वेतन, भत्ते याप्रमाणे लाभ देण्यात यावे. राज्यातील सर्वच रोजंदारी सफाई कामगारांना समान वेतन असावे. त्यानुसार गृह विभागातील रोजंदारी सफाई कामगारांनाही वेतन देण्यात यावे. विभागातील कायम असलेल्या सफाई कामगारांना लाड - पागे समितीच्या शिफारशी लागू करण्यात याव्यात. या कामगारांना २०१७ च्या शासन निर्णयानुसार वेतन अदा करताना मागील थकबाकीही देण्याबाबत चर्चा केली असून, कुठल्याही सफाई कामगारावर अन्याय होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश राज्यमंत्री श्री कदम यांनी दिले.बैठकीस पोलिस महानिरीक्षक (प्रशासन) अभिषेक त्रिमुखे, उपसचिव रवींद्र पाटील, महाराष्ट्र राज्य सर्व श्रमिक संघाचे उदय भट, जीवन सुरुडे आदी उपस्थित होते.

## 'मुख्यमंत्री उद्योजकता व नाविन्यता महाफंड'या योजनेंतर्गत जास्तीत जास्त रोजगार निर्माण करणार : कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता व नाविन्यता धोरण २०२५ मध्ये ''मुख्यमंत्री उद्योजकता व नाविन्यता महाफंड''योजना राबविण्यात येणार आहे. विविध तंत्रशिक्षण प्राप्त ३० लाख युवक-युवतींची शासनाकडे नोंद आहे. या सर्वांना ईमेल करून त्यांची एआयद्वारे परीक्षा घेण्यात येईल. यामध्ये पाच लाख युवक-युवतींची विविध पद्धतीद्वारे निवड करण्यात येईल. यातून पुन्हा चाळणी करून १ लाख उमेदवारांची मूल्यांकन चाचण्या,स्पर्धा व हॅकाथॉनच्या माध्यमातून निवड केली जाईल. अंतिम टप्प्यात २५,००० निवडक उमेदवारांना त्यानंतर तांत्रिक सहाय्य, आर्थिक मदत आणि प्रशिक्षण देऊन यशस्वी उद्योजक, स्टार्टअप्स तयार करण्याचे उद्दिष्ट आहे. आयटीआय मध्ये तांत्रिक शिक्षणासोबत इतर अनुषंगिक व्यक्तीमत्व विकासाचे २० अभ्यासक्रम १५ सप्टेंबर पासून सुरू होणार असल्याची माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली.

मंत्रालयात कौशल्य, रोजगार व उद्योजकता नाविन्यता विकास विभागाच्या अनुषंगाने राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत मंत्री श्री. लोढा बोलत होते. यावेळी कौशल्य विकास आयुक्त लहुराज माळी उपस्थित होते. मंत्री श्री.लोढा म्हणाले की, ''महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नाविन्यता धोरण २०२५'' ला मान्यता देण्यात आली असून या धोरणाची अधिकृत अंमलबजावणी करण्यात येणार आहे. हे



धोरण महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत राबविले जाणार आहे. या धोरणाद्वारे महाराष्ट्रात भारतातील सर्वात गतिशील व भविष्यवेधी स्टार्टअप केंद्र उभारण्याचा उद्देश आहे.या धोरणात पुढील पाच वर्षांसाठी महत्त्वाकांक्षी दृष्टिकोन मांडण्यात आला असून १.२५ लाख उद्योजक घडवणे व ५०,००० स्टार्टअपना मान्यता देण्याचे उद्दिष्ट आहे. शहरी, ग्रामीण, महिला आणि युवा उद्योजकांसह सर्व क्षेत्रांतील उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि वंचित समुदायांवर लक्ष केंद्रित केले जाईल. या धोरणातील एक महत्त्वाचा घटक म्हणजे निवडलेल्या उमेदवारांना वित्तीय संस्थांच्या भागीदारीतून रु.५.०० लक्ष ते रु.१०.०० लक्ष पर्यंत कर्ज साहाय्य दिले जाईल. पाच वर्षांच्या कालावधीसाठी ५०० कोटी रुपयांचा निधी () उभारला जाईल. महाराष्ट्र स्टार्टअप वीक अंतर्गत निवड झालेल्या स्टार्टअप्सना राज्यशासन विभागांसोबत थेट काम करण्याची संधी मिळेल आणि रुपये २५ लाखांपर्यंतचे प्रायोगिक तत्वावर कार्यादेश दिले जातील. राज्यातील प्रत्येक विभाग आपल्या वार्षिक तरतुदीपैकी ०.५% निधी नाविन्यता व उद्योजकतेसाठी उपलब्ध करेल. यामधील सर्व योजना महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी यांच्या सहाय्याने राबवण्यात येतील, जी राज्यातील नाविन्यता व उद्योजकता क्षेत्रातील सर्वोच्च संस्था म्हणून काम करेल.

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतिदिनानिमित्त मुंबईत खाशाबा जाधव पारंपरिक क्रीडा महाकुंभचे आयोजन**

मंत्री श्री.लोढा म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मृतीदिनानिमित्त मुंबईत ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव पारंपरिक क्रीडा महाकुंभचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या १३ ते २२ ऑगस्ट दरम्यान कुर्ला येथे जामसाहेब मुकादम शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या मैदानात, मुंबईकरांना पारंपरिक खेळांचा थरार पाहायला मिळणार आहे. या क्रीडा महाकुंभच्या माध्यमातून लेझिम, फुगडी आणि लगोरी, विटी दांडूसह शिवकालीन पारंपरिक खेळांना पूनर्वैभव मिळवून देणार आहे.

पारंपरिक खेळांच्या या क्रीडा महाकुंभात कब्बडी, खो-खो, लगोरी, लेझीम, रस्सीखेच,मल्लखांब, पावनखिंड दौड, कुस्ती,पंजा लढवणे, विटी-दांडू,दोरीच्या उड्या, फुगडी आणि योग या क्रीडा प्रकारात महिला आणि पुरुष गटातील सामन्यांचे आयोजन करण्यात आले आहे. कुर्ला येथे जामसाहेब मुकादम शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या मैदानात होणाऱ्या या क्रीडा महाकुंभात ही जनतेने सहभागी व्हावे असे आवाहनही मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले आहे.

## इलेक्शन कमिशनर असं वागत असतील तर संशयास्पद

### आमदार जितेंद्र आव्हाड यांचा पत्रकार परिषदेत आरोप

**ठाणे/प्रतिनिधी :** हीव्हीपॅट जर घालवणार असतील तर त्यांनी इव्हीएम पण काढून टाकावं. होऊ द्या बॅलेट पेपरवर मतदान. लोकांची इच्छा आहे. बॅलेट पेपरवर मतदान करण्याची तर व्हीव्हीपॅट हे सुप्रीम कोर्टाने कंपल्सरी केलं होतं, का काढत आहेत? लोकांना ईव्हीएमवर शंका आहे. मतदार याद्यांवर शंका आहे, संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर शंका निर्माण होत आहे. अशा परिस्थितीत इलेक्शन कमिशनर असं वागत असतील तर संशयास्पद आहे.असा आरोप आमदार जितेंद्र आव्हाड यांनी पत्रकार परिषदेत केला.

यावेळी ते म्हणाले की, लोकसभेच्या पराभवानंतर सरकारने निवडणूक आयोगाचा वापर केला. संपूर्ण निवडणूक प्रक्रियेमध्ये सत्ताधाऱ्यांना मदत करण्याचं काम केलं ते लांच्छनास्पद आहे. तुमच्याकडे तयारी करायला वेळ आहे, तुम्ही बॅलेट पेपरवर मतदान घ्या, तयारी करायला वेळ आहे. स्थानिक स्वराज्य निवडणुका तारीख पे तारीख दिली जात आहे.त्यांनी तयार केलेली प्रभाग रचना ही संशयास्पद आहे. ठाण्याच्या प्रभाग रचनेमध्ये जर कळवा, मुंब्रा, दिवा याचा विचार



केला तर, जागाच कमी केलेल्या आहे. तिथे जागा अधिक द्यायला पाहिजे होत्या. तिथल्या जागा कमी करून त्या ठाणे शहरात देण्यात आल्यात. तिथल्या लोकांवर यांनी अन्याय केलाय. त्याच प्रभाग रचना कायम ठेवण्याचे काम ठाणे महानगरपालिका प्रशासनाने केले.

आम्ही निवडणूक आयोगाला पत्र आधीच दिलेल आहे की, प्रभाग रचनेत लक्ष घाला. समान समान लोकसंख्या असलेल्या वार्ड पाहिजेल असा नियम आहे.प्रत्येक ठिकाणी जन भावना विचारात घ्यायला हवी.सरकार काय जनभावनेच्या बाबतीत विचार करते. आम्हाला माहित नाही. अशी माहिती आमदार जितेंद्र आव्हाड यांनी पत्रकार परिषदेत दिली केली.

## प्रांजल खेवलकर यांच्या मोबाईलमध्ये नग्न आणि अर्धनग्न फोटो, व्हिडिओ

### राज्य महिला आयोग अध्यक्ष रुपाली चाकणकर यांची पत्रकार परिषदेत माहिती

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** प्रांजल खेवलकर यांच्या मोबाईलमध्ये हिडन फोल्डरमध्ये नग्न आणि अर्धनग्न फोटो, व्हिडिओ आढळले आहेत. महिलांना चित्रपटात काम देतो, म्हणून बोलवून घेण्यात आले. लोणावळा, साकीनाका येथे पार्ट्या झाल्या आहेत. त्यांच्यावर अत्याचार करण्यात आलेला आहे. महिलांसोबत आपत्तीजनक चॅटिंग केले आहे. १ हजार ७४९ अधिक नग्न फोटो आणि व्हिडिओ सापडले आहेत. २३४ फोटो २९ व्हिडिओ अत्यंत अश्लील आहेत. नशा देऊन लैंगिक अत्याचार केलेले आहेत. हे फोटो, व्हिडिओ ब्लॅकमेल करण्यासाठी वापरले आहेत. मोलकरणीचे देखील फोटो आणि व्हिडिओ आहेत. अरुष नावाचा व्यक्ती मुली पुरवत होता. त्यांना सिनेमात काम करण्याच अमिश दिले जायचे. मुलीचे शोषण करण्यात आले आहे. मानवी तस्करी विरोधी पथक या प्रकरणात काम करत आहेत. महिलांची तस्करी करण्यात आलेली आहे.आरोपीने २८ वेळा रूम बुक केल्या आहेत. मोबाईल, आर्थिक व्यवहार, मेल चा तपास



करण्यात यावा. दोषींवर कठोरपणे कारवाई करण्यात यावी. महिलांचे अनैतिक शोषण आहे.एसआयटीच्या माध्यमातून योग्य तपास व्हावा. ज्यांचे लैंगिक शोषण झाले आहे, त्या मुलींनी समोर येऊन तक्रार द्यावी.



त्यांचे नाव गोपनीय ठेवले जाईल. सर्व व्हिडिओ, फोटो हे प्रांजल खेवलकर यांच्या मोबाईलमधील आहेत. हे फार मोठं रॅकेट आहे, हे उघडकीस येईल. अनेक व्हिडिओमध्ये खेवलकर स्वतः आहेत.आर्थिक परिस्थिती बिकट असलेल्या मुलींचा वापर केला गेला आहे. पीडित मुलींनी समोर येऊन तक्रार द्यावी, काही मुलींनी तक्रार दिली आहे.अनेक वर्षांपासून सर्व आरोपी एकमेकांच्या संपर्कात आहेत. लोणावळा, जळगाव, साकीनाका येथे हे सगळे प्रकरण सुरू होत. सहानुभूती वाटत आहेत. हे सर्व माहीत झाल्यानंतर त्यांचे अनेक गैरसमज दूर होतील.त्यांना आणखी काही सांगायचे असल्यास कोर्टात सांगावे.असे मत पत्रकार परिषदेत राज्य महिला आयोग अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी व्यक्त केले.

# मेहकर तालुक्यातील अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांना ६६ कोटींची नुकसानभरपाई जाहीर

## राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांच्या पाठपुराला यश

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** तालुक्यात २५ व २६ जून रोजी झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसाने तालुक्यातील सर्वाधिक नुकसान झाले होते.मेहकर तालुक्यात तब्बल ६५ हजार ६०१ हेक्टर वरील पिकांची प्रचंड नुकसान झाल्याने शेतकरी हतबल झांला होता. त्यानंतर पंधरा दिवसांनी पुन्हा अतिवृष्टी झाल्याने नैसर्गिक संकटाने शेतकऱ्यांसमोर जीवनमरणाचा प्रश्न उभा राहिला. नैसर्गिक संकटामुळे उध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना शासनाने तात्काळ आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे युवक जिल्हाध्यक्ष गोपाल पाटील आखाडे यांनी याबाबत केंद्रीय माजी कृषिमंत्री शरदचंद्र पवार यांच्याकडे पाठपुरावा करून तात्काळ आर्थिक निधी मिळवून देण्याची मागणी केली होती. सदर मागणीची दखल घेत केंद्रीय माजी कृषीमंत्री शरदचंद्र पवार यांनी मुख्यमंत्री यांना पत्र लिहून शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत देण्यासाठी पाठपुरावा केला होता. सदर मागणीची दखल घेत राज्य शासनाच्या वतीने ६ ऑगस्ट रोजी मेहकर तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांना ६६ कोटी रुपयांची निधी आर्थिक मदत जाहीर केली आहे.


मेहकर तालुक्यात ३९ हजार २०१ हेक्टर वरील पिकांना फटका
➤ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत देण्याची मागणी :
➤ राष्ट्रवादी काँग्रेस युवक बुलढाणा जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन
दैनिक आपला विदर्भ | संपादकीय
डोणगाव व रिसोड परिसरातील नुकसानीबाबत खासदार शरदचंद्र पवार यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र
राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हा जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे व माधव शेवाळे यांच्या निवेदनाची दखल



बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर लोणार परिसरात २५ व २६ जून रोजी डगपोटी सदृश्य पाऊस होऊन प्रचंड नुकसान झाले होते. मेहकर तालुक्यातील तब्बल ६५ हजार ६०१ हेक्टर वरील पिकांची नुकसान झाली होती. त्याचबरोबर घरात पाणी जाऊन तसेच घरे पडून तालुक्यातील ३५५ घरांचे नुकसान झाले.त्याचबरोबर तालुक्यातील शेंद्रा येथील आशाबाई प्रभाकर लोंढे या महिलेच्या अंगावर घराची भिंत पडून तिचा मृत्यू झाला. तर, तालुक्यातील दादुलगाव येथील रोहिदास श्रावण शिरसाट या इसमाचा पुराच्या पाण्यात वाहून जाऊन मृत्यू झाला. बुलढाणा जिल्ह्यात जवळपास ८७ हजार ३९०.२ हेक्टर वरील पिके पिकांची नुकसान झाले असून ९० हजार ३८३ शेतकरी बाधित झाले आहेत. मेहकर तालुक्यातील व बुलढाणा जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे युवक जिल्हाध्यक्ष गोपाल पाटील आखाडे यांनी केंद्रीय माजी कृषीमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती. सदर निवेदनाची दखल घेत खासदार शरदचंद्र पवार यांनी मुख्यमंत्री यांना पत्र लिहून बाधित शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत देण्यासाठी पाठपुरावा केला होता.सदर मागणीची दखल घेत मदत व पुनर्वसन विभागाने तातडीने कार्यवाही करत ६ ऑगस्ट २०२५ रोजी बुलडाणा जिल्ह्यासाठी ७४४५.३ लाख रुपयांची नुकसान भरपाई मंजूर केली आहे. यामध्ये मेहकर मतदार संघातील शेतकऱ्यांना तब्बल ६६ कोटी रुपयांची मदत जाहीर केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांच्या पाठपुराव्याने शेतकऱ्यांना मदत जाहीर झाल्याबद्दल शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## विविध वृत्त...

### भाजप नेत्या माजी खासदार नवनीत राणा यांना इस्टाग्रामवर जीवे मारण्याची धमकी

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** अमरावती जिल्ह्याच्या माजी खासदार आणि भाजप पक्षाच्या नेत्या नवनीत राणा यांना सोशल मीडिया च्या माध्यमातून थेट धमकी देण्यात आली.. इसाभाई नामक व्यक्तीच्या इन्स्टाग्राम वरून नवनीत राणा यांना अश्लील शिवीगाळ तसेंच जीवे मारण्याच्या धमकी दिल्याची प्रतिक्रिया नवनीत राणा यांचे खाजगी स्वीय सहाय्यक विनोद गुहे यांनी दिलेल्या पोलीस तक्रारी त म्हटले आहे. विनोद गुहे यांनी ७ऑगस्ट रोजी थेट राजापेठ पोलीस स्टेशनं गाठून इसाभाई नामक व्यक्ती विरोधात तक्रार दाखल केली. यावेळी राजापेठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांच्या मार्गदर्शनातं पोलिसांनी प्राथमिक तपास करून इसाभाई नामक व्यक्ती विरुद्ध कलम २९६,३५७,(३)७९आय टी ॲक्ट नुसार गुन्हे दाखल करण्यात आले.या प्रकरणाच्या तपासात आता राजापेठ पोलीस लागले आहे.

### शिक्षणमंत्री दादा भुसे व जिल्हाधिकारी पंडा यांची अपघातस्थळी भेट; शोकाकुल कुटुंबांचे सांत्वन, ग्रामस्थांना शांततेचे आवाहन




दैनिक आपला विदर्भ


**गडचिरोली/प्रतिनिधी :** गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी-गडचिरोली महामार्गावर घडलेल्या दुर्घटनेनंतर राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा व आमदार डॉ मिलिंद नरोटे यांनी तातडीने अपघात स्थळी भेट दिली व मृत्यूमुखी पडलेल्या युवकांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. तत्पूर्वी त्यांनी एमआयडीसी हेलिपॅड येथे जखमींची भेट घेऊन त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. दोन जखमींना नागपूर येथे हेलिकॉप्टरने पुढील उपचारासाठी हलविण्यात आले आहे.

या भेटीदरम्यान अनेक ग्रामस्थ भावनिक अवस्थेत होते. अपघातामुळे संतप्त झालेल्या नागरिकांशी मंत्री भुसे आणि जिल्हाधिकारी पंडा यांनी थेट संवाद साधला. त्यांनी ग्रामस्थांच्या भावना समजून घेतल्या आणि संयम बाळगण्याचे आवाहन केले. ''दुर्घटनाग्रस्त कुटुंबियांच्या दुःखात शासन तुमच्या सोबत असून योग्य ती मदत आणि कारवाई केली जाईल,'' असे आश्वासनही त्यांनी दिले.

### मोडी लिपीच्या प्रशिक्षणाला इतिहास प्रेमींचा प्रतिसाद. मात्र शासनाची उदासीनता



**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्यातील भूमी अभिलेख, महसूल विभाग, जिल्हा परिषद या कार्यालयांमध्ये अनेक पुरातन नोंदी, दस्तऐवज उपलब्ध आहेत, यातील बरेच दस्तऐवज हे मोडी लिपी मध्ये पाहायला मिळतात. शिवाय छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील दस्तऐवज मोडी लिपी मध्ये पाहायला मिळतात. या सर्व ऐतिहासिक दस्तावेजांचा अभ्यास व्हावा, संवर्धन व्हावे यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पुराभिलेख संचालनालयाच्या वतीने तज्ञांच्या मार्फत प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले जात आहे, बुलढाण्यात गेल्या दहा दिवसापासून जिजामाता महाविद्यालय आणि पुराभिलेख संचालनालयाच्या संयुक्त विद्यमाने दहा दिवसीय मोडी लिपी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे, या प्रशिक्षण वर्गाला इतिहास प्रेमींचा चांगला प्रतिसाद पाहायला मिळाला, ४४ विद्यार्थी या वर्गात सहभागी झाले आहेत, मात्र ऐतिहासिक दस्तऐवज असलेल्या विभागाला पत्र व्यवहार करून देखील त्यांनी आपले प्रतिनिधी कर्मचारी या वर्गाला पाठवले नसल्याने जिल्हा प्रशासन याबाबतीत उदासीन असल्याचं पाहायला मिळत आहे. त्यामुळे इतिहास प्रेमींकडून संताप व्यक्त केला जातोय.



### अकोल्यात हिंदू खाटीक समाजा कडून अर्जुन खोतकर यांच्या फोटो ला चप्पल मारो आंदोलन

**अकोला/प्रतिनिधी :** अकोल्यात आज हिंदू खाटीक समाजा कडून अर्जुन खोतकर यांच्या फोटो ला चप्पल मारो आंदोलन करून निषेध केला आहे. तर अर्जुन खोतकर यांनी खाटीक समाजा बद्दल केलेल्या वक्तव्याच्या विरोधात आज जिल्हाधिकारी कार्यालया समोर अर्जुन खोतकर यांच्या विरोधात निदर्शने करीत खोतकर यांच्या बॅनर वरील फोटोला चप्पल मारो आंदोलन करण्यात आले आहे.




## शिक्षण विभागाचा भोंगळ कारभार जिल्हाधिकारी व नायब तहसीलदार यांच्या पत्राकडे शिक्षणाधिकाऱ्याची डोळे झाक

**धुळे/प्रतिनिधी :** धुळे शहरातील सुप्रसिद्ध असलेल्या जयहिंद शैक्षणिक संस्थेत ॲडमिशन च्या नावावर डोनेशन घेऊन मोठा भ्रष्टाचार करीत आहे. संदर्भात संबंधित जयहिंद शैक्षणिक संस्थे विरोधात तात्काळ कारवाई करून या शैक्षणिक संस्थेची मान्यता रद्द करावी अशी मागणी रिपब्लिकन सेनेच्या वतीने शिक्षणाधिकारी यांच्याकडे केली होती. मात्र अद्याप पर्यंत या शैक्षणिक संस्थे विरोधात कुठलीही कारवाई केली नसल्यामुळे धुळे जिल्हाधिकारी यांच्याकडे ही सर्व परिस्थिती मांडण्यात आली. मात्र धुळे जिल्हाधिकारी यांनी शिक्षण अधिकारी यांना या प्रकरणात योग्य ती कारवाई करावी असे पत्र दिले असता शिक्षण अधिकारी यांनी त्या पत्राकडेही लक्ष दिले नाही. असा आरोप रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष समाधान बैसाने यांनी केला आहे.

त्यामुळे संबंधित जयहिंद शैक्षणिक संस्थे विरोधात सखोल चौकशी करून कायदेशीर कारवाई करावी या मागणीसाठी समाधान बैसाने हे धरणे आंदोलन करीत असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

## जिल्हा प्रशासनाला मिशन आशीर्वाद साठी राष्ट्रीय पुरस्कार

### केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते नवी दिल्लीत गौरव




**वाशीम/प्रतिनिधी :** जिल्हा प्रशासनाने सेंद्रिय शेतीच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत ''मिशन आशीर्वाद'' या उपक्रमासाठी ''सेंद्रिय शेती उत्कृष्टता पुरस्कार'' हा मानाचा राष्ट्रीय सन्मान प्राप्त केला आहे. हा पुरस्कार दुसरी शाश्वत शेती परिषद आणि पुरस्कार २०२५ या राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमात नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आला.

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते जिल्ह्याच्या वतीने उपविभागीय कृषी अधिकारी संतोष वाळके यांनी हा पुरस्कार स्वीकारला. जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या ''मिशन आशीर्वाद'' या उपक्रमामुळे वाशीम जिल्ह्याच्या सेंद्रिय शेती क्षेत्रातील कामगिरीला राष्ट्रीय मान्यता मिळाली आहे. या यशामध्ये जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाह आणि प्रकल्प संचालक आत्मा अनिसा महाबळे यांचा मोलाचा सहभाग आहे. शाश्वतता महत्त्वाची आहे, इंडीॲग्री, आणि ग्रेमॅटर्स या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने या पुरस्काराचे आयोजन करण्यात आले होते. ''मिशन आशीर्वाद'' उपक्रमाअंतर्गत वाशीम जिल्ह्यात सेंद्रिय शेती नवोपक्रम, बाजारपेठेची सशक्त जोडणी, आणि शाश्वत उत्पादन प्रणाली या घटकांमध्ये केलेल्या कार्यामुळे हा पुरस्कार प्राप्त झाला. या कार्यामुळे जिल्ह्याचा सेंद्रिय शेती आदर्श राष्ट्रीय पातळीवर उभा राहिला आहे. कृषी तज्ज्ञांनी व्यक्त केले की, हा पुरस्कार जिल्ह्यातील सेंद्रिय शेतीला नवी दिशा देणारा ठरेल आणि शेतकऱ्यांमध्ये सेंद्रिय शेतीबाबत जागृती व आत्मविश्वास निर्माण करेल.

## सेवानिवृत्त सैनिक संतोष जाधव यांचा रॅली काढन सत्कार; वाशीम रेल्वे स्थानकावरही मान्यवरांकडून स्वागत




**वाशीम/प्रतिनिधी :** भारतीय मराठा रेजिमेंट मध्ये १७ वर्ष देशसेवा सेवा करून भारतीय सैनिक संतोष मारोती जाधव सेवानिवृत्त होत २ ऑगस्ट रोजी गावी आले असता, त्यांचा जुमडा ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने भव्य सत्कार करून गावात रॅली काढून जल्लोषात स्वागत करण्यात आले. वाशीम तालुक्यातील जुमडा येथील सुपूत्र संतोष मारोती जाधव भारतीय सैन्य दलातील मराठा रेजिमेंटमध्ये १७ सर्व देशसेवा करून सेवानिवृत्त होत २ ऑगस्ट रोजी तालुक्यातील जुमडा गावी आले असता जुमडा ग्रामपंचायत, ग्रामस्थांच्या व मित्रमंडळांच्या वतीने भारतीय सेवानिवृत्त सैनिक संतोष जाधव यांची सपत्निक भव्य स्वागत रॅली काढून सत्कार करण्यात आला. वाशीम रेल्वे स्थानकावर सैनिक येताच या ठिकाणी मित्रमंडळ व मान्यवरांच्या वतीने गुच्छ देऊन तसेच मिठाई भरवून सत्कार केला. महिलांच्या वतीने औक्षण करू न स्वागत करण्यात आले. त्यानंवर सजविलेल्या वाहनामध्ये त्यांना सन्मानपूर्वक गावात आणण्यात आले. जुमडा गावात येताच फटाके फोडून व स्वागत रॅली काढून जल्लोषात स्वागत करण्यात आले. त्यानंतर ग्रामपंचायतीच्या वतीने संतोष जाधव यांचा सपत्निक सत्कार करण्यात आला. तसेच सैनिक संतोष जाधव यांचा सपत्निक वाशीम जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष चक्रधर गोटे यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. तसेच यावेळी सेवानिवृत्त सैनिक व त्यांच्या आई-वडिलांचा ग्रामस्थ व मित्रमंडळांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी जुमडा येथील सरपंच संदीप शिंदे, पोलीस पाटील भानुदास पडघान, तंटामुक्त समिती अध्यक्ष दगडू शिंदे, ग्रामसेवक गणेश इढोळे, मदन शिंदे, सुरेश शिंदे, कै लास शिंदे, ग्रामसेवक अमोल शिंदे, विठ्ठल शिंदे यांच्यासह ग्रामस्थांची तसेच परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## अलिबाग आहे की गुजरात? मनसे कार्यकर्त्यांचा संताप अनावर, मनसे मराठीसाठी आक्रमक

**अलिबाग/प्रतिनिधी :** अलिबाग मध्ये गुजराती पाट्यांकडे मनसेने मोर्चा वळवलाय. महाराष्ट्रात मराठी पाट्यांना दुय्यम स्थान देऊन काहीजण गुजराती पाट्या लावताना दिसतायेत. त्यामुळे अलिबागची मनसे सेना चांगलीच आक्रमक झालीय. महाराष्ट्रात मराठी पाट्याच लावाव्यात असा आग्रह करीत त्यांनी तात्काळ गुजराती पाट्या हटवा अन्यथा काळे फासू असा गर्भित इशारा दिलाय. यासाठी मनसे पदाधिकारी कार्यकर्त्यांनी १५ दिवसांचा अलटीमेटम दिलाय. अलिबाग तालुक्यातील कच्ची भवन इथं मनसैनिकांनी मराठीसाठी मनसे तालुका प्रमुख सिद्धू म्हात्रें च्या नेतृत्वात आंदोलन केले. यावेळी घोषणाबाजी करीत मराठी भाषेला सन्मान हवाय, मराठी चा अपमान कदापी सहन केला जाणार नाही असा जबर इशारा यावेळी दिलाय.



## विदर्भ कन्या शाईन पटेल यांच्या वतीने राष्ट्रीय विश्वगामी संघटनेतील नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार

दैनिक आपला विदर्भ

■ अबुतालीब खान

**सुलतानपूर:** राष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या राष्ट्रीय विश्वगामी संघटनेत नुकतीच निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा भव्य सत्कार समारंभ सुलतानपूर येथील शाईन बिछायत केंद्रात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे आयोजन समाजसेविका 'विदर्भ कन्या' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शाईन पटेल यांच्या वतीने करण्यात आले.

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुण आणि संघटनात्मक कार्यात दिलेल्या भरीव योगदानाची दखल घेऊन त्यांचा शाल, व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष शेख सज्जाद होते. प्रमुख पाहुणे म्हणून सुभाष भाऊ खेत्रे, राजेश पिंपरकर (तंटामुक्ती अध्यक्ष), मनोहर भानापुरे, प्रल्हाद टकले,सिपारत पहेलवान, वैभव बाबुळवार( उपसरपंच पारडी सिरसाट) समद पहेलवान, जाकीर पहेलवान, जुनेद पहेलवान आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी पत्रकार ज्ञानेश्वर धुळकेकर, वसिम पहेलवान, वसीम सौदागर, फैजल पहेलवान, नवाज पहेलवान, शेख मोईन, नबी पहेलवान, इम्रान पहेलवान, शोएब पहेलवान, अबरार खान, वैभव बांगरे, रुषीकेश मुळे, राधेश्याम मुळे, सोहेल पहेलवान, वाल्मीक अवारे, प्रेम कुडके, अविनाश कांबळे, यांच्यासह परिसरातील अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्कार समारंभात विश्वगामी पत्रकार संघटनेचे पदाधिकारी शेख सज्जाद ( जिल्हाध्यक्ष) साहिल खान (जिल्हा सचिव) भाई सुरेश मोरे (जिल्हा प्रवक्ते) तानाजी मापारी (तालुका अध्यक्ष) फिरदोस पठाण (तालुका उपाध्यक्ष) सय्यद जहीर (तालुका सचिव) अबुतालिब खान (तालुका कार्याध्यक्ष) शेख इमरान ( तालुका सहसचिव) शेख उबेद कुरेशी (शहर अध्यक्ष) भुशन शेटे (शहर सचिव) शेख वसीम (तालुका कोषाध्यक्ष) शेख निसार भाई, (ता.सदस्य) सचिन गायकवाड, (ता.सदस्य) राहुल मोहिते (ता.सदस्य), सतिश तेजनकर (सदस्य) याच्या समावेश होता.



कार्यक्रमाच्या शेवटी सर्व मान्यवरांनी संघटनेच्या भावी कार्याची दिशा ठरवत सामाजिक बांधिलकी अधिक मजबूत करण्याचा संकल्प केला. विदर्भ कन्या शाईन पटेल यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले आणि सामाजिक एकोपा, एकसंघ प्रयत्न व लोकहितासाठी संघटनेच्या कार्यास शुभेच्छा दिल्या.